# जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

## जिल्हा न्यायालयातील समित्यांचे बोर्ड तयार करुन बसविण्याबाबतचे दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागू राहतील.

01) प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी. सदरील दरपत्रक सोबतच्या नमुन्यामध्ये तयार करुन त्यावरील अधिकारी/सदस्य यांचे नांव व पदनाम बदलता येण्यासारखे बोर्ड यासाठीचे सर्व साहित्यासह देण्यांत यावे.

02) या कार्यालयाचे गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील. तसेच या कार्यालयाच्या गरजेनुसार नमुद संख्येमध्ये कमी जास्त होउ शकते.

03) निविदाकाराला अधिकृत पुरवठादार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी क्रमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

04) दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या करांसह, इतर चार्जस्, वगैरे यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच सदर बोर्ड तयार करण्यापुर्वी त्यावरील मजकुराची तपासणी कार्यालयामार्फत करुन घेणे आवश्यक आहे

05) दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकरांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

06) दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय पत्राचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक ही दिनांक 20/02/2024 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

07) सदरील दरपत्रके पाठवितांना ती **"मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश," जालना** यांचे नांवे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर **" बोर्ड तयार करण्याचे दरपत्रक"** असा उल्लेख करावा.

08) सदरील दरपत्रके ही सिलबंद पाकिटात टाकून पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** या पत्त्यावर पाठविण्यांत यावी.

09) सिलबंद दरपत्रके हे जिल्हा न्यायालय "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे समक्ष जिल्हा न्यायाधीश–1, जालना यांचे निजीकक्षात दिनांक 21/02/2024 रोजी उघडण्यात येतील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुसऱ्या दिवशी किंवा नियोजीत वेळेत व ठिकाणी समितीपुढे उघडण्यात येतील.

10) उपरोक्त बोर्ड बाबत जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या न्यायालयाने आदेश दिल्यानंतर पाच दिवसांच्या आत सुस्थितीत आणून बसवुन देण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठादार/संस्थेची राहिल, यांची नोंद घ्यावी.

12) सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना राखून ठेवत आहे.

**(सोबत नमुना जोडला आहे)**

आदेशान्वये

प्रबंधक

जिल्हा व सत्र न्यायालय

जालना

G:\Quotation for Curtain.odt 25

# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, जालना</u>

## निविदा / दरपत्रक

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या करिता नांव व पदनाम बदलता येण्यासारखे बोर्ड तयार करुन बसविण्याबाबत निविदा / दरपत्रक मागवित आहे.

उपरोक्त बोर्ड तयार करुन बसविण्यासाठी सदरील पुरवठादाराने आपले दरपत्रक सोबत दिलेल्या "नियम व अटींच्या" अधिन राहून या कार्यालयाच्या खालील पत्त्यावर सीलबंद पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** यांचे नावे दिनांक 20 / 02 / 2024 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

आदेशान्वये

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना

दिनांक : 13 / 02 / 2024.

G:\Quotation for Curtain.odt 26

You
01/02/2024 at 1:08 pm

## District Court, Jalna Gender Sensitization and Internal Complaints Committe (DCJGSICC)

## जिल्हा न्यायालय, जालना लिंग संवेदीकरण आणि महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासंबंधी अंतर्गत तक्रार निवारण समिती

मा. जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांचे दि.०१/०८/२०२३ रोजीच्या आदेशानुसार लिंग संवेदीकरण आणि महिलांच्या लैंगिक छळासंबंधी अंतर्गत तक्रार निवारण समिती नव्याने गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीतील अध्यक्ष व सदस्यांची नावे आणि E-mail address खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | समिती सदस्यांची नावे | पद |
|---|---|---|
| १ | श्री. किशोर एम. जयस्वाल<br>जिल्हा न्यायाधीश-३ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जालना | अध्यक्ष |
| २ | श्री. एस. जी. अडके<br>जिल्हा न्यायाधीश-४ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जालना | सदस्य |
| ३ | श्रीमती बी. एस. गारे<br>तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जालना | सदस्य |
| ४ | श्रीमती एस.आर. [redacted] रानवे<br>सह दिवाणी न्यायाधीश - (व. स्तर), जालना | सदस्य सचिव |
| ५ | श्री. बी.व्हि. इंगळे<br>प्रभारी जिल्हा सहकारी अभियोक्ता, जालना | सदस्य |
| ६ | ॲड. जे.सी. बडवे, जिल्हा वकील संघ, जालना | सदस्य |
| ७ | ॲड. श्रीमती व्हि. एल. मूकीम, जिल्हा वकील संघ, जालना | सदस्य |
| ८ | श्रीमती एस.एन. पुराणिक, वरीष्ठ लिपीक तथा सदस्य जालना जिल्हा न्यायालय कर्मचारी संघटना, जालना | सदस्य |
| ९ | श्रीमती विमल अशोकराव आगलावे, अध्यक्षा सत्यदिप महिला मंडळ, जालना | सदस्य |

E-mail : dcjgsiccjalnacourt@gmail.com Contact No. 02482-225253

साईज 4x4 फुट

**You**

01/02/2024 at 1:09 pm




साईज 2×3 फुट